follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 ※ वर्ष २५ ※ अंक २७५ ※ सातारा ※ शनिवार ※ दि. १५ जून २०२४ ※ पाने ८ ※ किंमत ५ रू/

# शरद पवारांसोबत पुन्हा परत जाणार का?

## छगन भुजबळांनी थेटच सांगितलं



**मुंबई :** अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मंत्री छगन भुजबळ नाराज असल्याच्या चर्चा सुरू आहेत. भुजबळ यांनी काही दिवसापूर्वी महायुतीविरोधात काही विधाने केली होती.

गेल्या काही दिवसापासून अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील मंत्री छगन भुजबळ नाराज असल्याच्या चर्चा सुरू आहेत. आधी नाशिक लोकसभेच्या उमेदवारीवरुन तर आता राज्यसभेच्या जागेवरुन ते नाराज असल्याच्या चर्चा सुरू आहेत. काही दिवसापूर्वी त्यांनी महायुतीच्या विरोधात काही विधानेही केली होती. यामुळे त्यांच्या नाराजीच्या चर्चा जोरदार सुरू होत्या, ते काही दिवसातच शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, या चर्चांवर आज भुजबळ यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

**शरद पवारांसोबत जाणार का?**

**यावेळी छगन भुजबळ यांना शरद पवार गटाकडे जाण्याचा दरवाजा उघडा ठेवला आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना भुजबळ म्हणाले, असं तुम्हाला वाटतं. हा तुमचा प्रचार आहे. या सर्वात मी नेहमी सत्याची बाजू घेत आलो आहे. मला जे वाटतं खरं आहे, तेच बोलतो. मला वाटलं की या प्रश्नाचं उत्तर अवघड आहे. तेव्हा सांगतो मला उत्तर नाही द्यायचं. असं काही नाही. ना माझी खिडकी उघडी आहे ना माझा दरवाजा उघडा आहे. ना कोणी माझ्यासाठी रेड कार्पेट टाकलं आहे, असं काही नाही, असं सांगत कुठेही जाणार नसल्याचं सांगितलं.**

वस्तुस्थिती काय आहे हे लक्षात घेऊन पुढची पावलं टाकायची आहे. त्यातून काही धडा घ्यायचा आहे. पक्षाला आणि युतीला. ज्या त्रुटी आहे, त्या दूर करायच्या आहेत. मी आहे त्या पक्षात युतीसोबत राहणार आहे, असंही छगन भुजबळ म्हणाले.

# कुवेतमधून ४५ भारतीयांचे मृतदेह देशात पोहोचले

## मुंबईतील मालाडच्या कामगाराचाही आगीत होरपळून मृत्यू, पंतप्रधान मोदींकडून मदतीची घोषणा



कुवेतच्या दक्षिण मंगफ परिसरातील इमारतीला लागलेल्या भीषण आगीत काही दिवसांपूर्वी ४५ भारतीयांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आता कुवेतमधून (घ्रुॅरळीं) ४५ भारतीय नागरिकांचे मृतदेह घेऊन हवाई दलाचं विमान मायदेशात परतलं आहे. या दुर्घटनेत मुंबईतील मालाड येथे राहणाऱ्या डेनी बेबी करुणाकरण यांचा देखील दुर्दैवी मृत्यू झाला.

हवाई दलाचं विमान ४५ भारतीयांचे मृतदेह घेऊन भारतात परतलं

भारतीय हवाई दलाच्या उ-१३०ग या विशेष विमानाने मृतदेहांना कुवेतहून भारतात आणलं गेलं. कोचीन आंतरराष्ट्रीय विमानतळावर या विमानाचं आगमन झालं. मृतांच्या यादीत केरळमधील २३, तामिळनाडूतील ७, आंध्र प्रदेशातील ३ जणांचा समावेश आहे. या ३० जणांचे मृतदेह कोचीन आंतरराष्ट्रीय विमानतळावर संबंधित राज्य शासनाकडे सुपुर्द करण्यात आले. उर्वरित मृतदेहांना नवी दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर भारतीय हवाई दलाच्या उ-१३०ग या विशेष विमानाने आणलं गेलं.

बुधवारी पहाटे साडेचार वाजता ही आग लेबर कॅम्पच्या स्वयंपाकघरातून इलेक्ट्रिक शॉर्ट सर्किटमुळे लागली. भीषण आग लागल्यानंतर काही लोकांनी अपार्टमेंटमधून उड्या मारल्या, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला, तर काहीजण आगीत होरपळून आणि धुरामुळे गुदमरून मृत्युमुखी पडले. कुवेतमधील भारतीय दूतावासाने ही माहिती दिली. या दुर्घटनेत मृत झालेल्यांमध्ये महाराष्ट्रातील एका कामगाराचा समावेश आहे. मुंबईच्या मालाड (पश्चिम), मालवणी येथील ३३ वर्षीय डेनी बेबी जे मागील चार वर्षांपासून कुवेतमधील एका खाजगी कंपनीत अकाऊंटंट आणि सेल्स समन्वयक म्हणून काम करत होते, ते मृत्युमुखी पडले.

मृतांच्या यादीत केरळमधील २३, तामिळनाडूतील ७, आंध्र प्रदेशातील ३, उत्तर प्रदेशातील ३, ओडिशातील २ आणि बिहार, पंजाब, कर्नाटक, पश्चिम बंगाल, झारखंड, हरियाणा यासारख्या उर्वरित सात राज्यांमधून प्रत्येकी एक अशा एकूण ४५ जणांचा समावेश आहे.

मालाडमधील व्यक्तीचा मृतदेह मुंबईत पोहोचला

भारतीय परराष्ट्र मंत्रालय आणि कुवेती अधिकारी सतत संपर्कात असून या दुर्घटनेत जखमी झालेल्या ५० हून अधिक भारतीयांवर उपचार सुरु आहेत. तसेच, मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींचे मृतदेह त्यांच्या कुटुंबियांकडे सोपवण्यात येणार आहेत. मालाड येथील डेनी बेबी करुणाकरण यांचा मृतदेह दिल्ली येथून रात्री ११.४० वाजता ६ई ५१९ या विमानाद्वारे मुंबईत पाठवण्यात आला आहे.

सदर विमान शनिवारी पहाटे १.४० वाजता मुंबईत पोहोचलं. परराष्ट्र राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंग यांनी कुवेत येथील घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी करून आवश्यक समन्वय साधत या मोहिमेत मत्त्वाची भूमिका बजावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या दुर्घटनेत मृत पावलेल्या भारतीयांच्या कुटुंबीयांना दोन लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. त्यांनी पीडित कुटुंबांना शक्य त्या सर्व प्रकारची मदत दिली जाईल, असं आश्वासन दिलं आहे. त्यांनी एक्सच्या माध्यमातून हा दुर्दैवी प्रसंग अत्यंत वेदनादायक असल्याचा शोक व्यक्त केला आणि मृतांच्या कुटुंबियांच्या दु:खात आपण सहभागी असल्याची भावना व्यक्त केली.

# पेट्रोल-डिझेलबाबत मोठा निर्णय होणार?

**नवी दिल्ली :** गतवर्षात जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत (ऋड्ढ डेींपलळश्र चशशींळपस) अनेक मोठे निर्णय घेण्यात आले. शेवटची बैठक ७ ऑक्टोबर २०२३ रोजी झाली होती. यावर्षी मार्चमध्ये असं बोललं जात होतं की, जीएसटी कौन्सिलची बैठक आता होणार नाही. परंतु, आता जीएसटी कौन्सिल सचिवालयानं सांगितलं आहे की, पुढची ५३वी जीएसटी कौन्सिलची बैठक २२ जून २०२४ रोजी होणार आहे.

जीएसटी कौन्सिलची बैठक नवी दिल्लीत होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन (ऋळपरपलश चळपळीींशी छळीारश्र डळींहरीरारप) यांच्या नेतृत्वात ही बैठक पार पडणार आहे. यासोबतच राज्यमंत्री, महसूल सचिव, सीबीआयसीचे अध्यक्ष, सदस्य मुख्यमंत्री, सदस्य जीएसटी आणि इतर अधिकारी उपस्थित राहू शकतात. या बैठकीत ऑनलाईन गेमिंगपासून ते पेट्रोल आणि डिझेलचा ऋड्ढ कक्षेत समावेश करण्यापर्यंत सर्व गोष्टींवर निर्णय घेतला जाऊ शकतो. त्यामुळे या बैठकीकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे.

पेट्रोल आणि डिझेलबाबत मोठा निर्णय घेण्याची शक्यता

अर्थसंकल्पापूर्वी जीएसटीशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर परिषदेत चर्चा होणार आहे. याशिवाय व्यावसायिकांसाठी कंप्लायंस सुलभ करण्यावर भर दिला जाणार आहे. इनव्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चरच्या समस्या दूर करण्याबाबत निर्णय घेणं शक्य आहे.

याशिवाय पेट्रोल-डिझेलचा जीएसटीच्या कक्षेत समावेश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण लोकसभा निवडणुकीच्या निकालापूर्वी मोदी सरकार आल्यास पेट्रोल-डिझेलचाही जीएसटीच्या कक्षेत समावेश होईल, असं बोललं जात होतं. त्यामुळे मोदी सरकार पहिल्या शंभर दिवसात हा मोठा निर्णय घेऊ शकते, असं बोललं जात आहे.

मागील बैठकीत काय निर्णय झाले?

ऑक्टोबरच्या बैठकीत जीएसटी कौन्सिलनं ऑनलाईन गेमिंग, कॅसिनो आणि हॉर्स रेसिंगवर २८ टक्के शुल्क लावण्याचा निर्णय घेतला होता. नंतर, मार्च ऋड्ढ बैठकीत, कौन्सिलनं ऑनलाईन गेमिंगच्या उत्पन्नावर लादलेल्या २८ टक्के कराचा आढावा पुढे ढकलला होता.

२८ टक्के ऋड्ढ नियमाच्या घोषणेनंतर, ऑनलाईन गेमिंग उद्योगानं या निर्णयाला जोरदार विरोध केला, कारण कर वाढल्यानं त्यांचं मोठं नुकसान होऊ शकते. १२५ हून अधिक कंपन्यांच्या नेत्यांनी सरकारला पत्र लिहून त्यांच्या कामकाजावर २८ टक्के जीएसटीच्या परिणामाबद्दल चिंता व्यक्त केली होती. सरकारला लिहिलेल्या पत्रानंतर, माजी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी सांगितले होतं की, त्यांचं मंत्रालय जीएसटी परिषदेला आपल्या निर्णयाचं पुनरावलोकन करण्याची विनंती करेल.

# मराठा आरक्षणाचा प्रश्न १५ दिवसांत निकाली काढा

## भाजपच्या मराठा आमदारांची बैठकीत मागणी



**मुंबई :** मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यात दिरंगाई नको. १५ दिवसांत आरक्षणाचा प्रश्न निकाली काढा, अशी मागणी भाजपच्या मराठा आमदारांनी चंद्रकांत पाटील यांच्याकडे केली आहे. दरम्यान, आपण केलेली कामे मराठा समाजात अधिक आक्रमकपणे मांडा, अशा सूचना चंद्रकांत पाटील यांनी मराठा आमदारांना दिल्या आहेत. सारथी, अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाच्या योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे निर्देशही चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. भाजपच्या मराठा आमदारांची बैठक पार पडली. याबैठकीत मराठा आरक्षणाच्या मुद्यावर चर्चा झाली आहे.

आपण प्रत्यक्षात केलेली कामे मराठा समाजापर्यंत अधिक आक्रमकपणे पोहोचवा

मराठा आरक्षणाच्या मुद्यावर आधी फडणवीस सरकार आणि आता शिंदे फडणवीस सरकार यांनी केलेली काम मराठा समाजापर्यंत पोहचवा, असा आदेश चंद्रकांत पाटील यांनी दिला आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठ्यांना आरक्षण दिलं आणि टिकवल जाईल हे समाजापर्यंत पोहोचवा. आजवर आपण प्रत्यक्षात केलेली कामे मराठा समाजापर्यंत अधिक आक्रमकपणे पोहोचवा, असंही चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे.

**चंद्रकांत पाटील काय काय म्हणाले?**

मराठा समाजाला आरक्षण व इतर सुविधा देऊनही समाजात असंतोष आहे. खास करून भाजपच्या बाबतीत हा असंतोष दिसतोय. आम्ही काही कमी पडलोय का? योजनांची माहिती मराठा समाजापर्यंत पोहचली पाहिजे. अण्णासाहेब पाटील महामंडळाला आम्ही बळकटी दिली. सारथी मार्फत मराठा व कुणबी मुलांच्या शैक्षणिक कामासाठी मदत करणारी संस्था आहे. येत्या मंगळवाळपासून आम्ही पुन्हा बैठका घेतोय. लोकांपर्यंत नीट सर्व पोहचण्याचा व गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करणार आहोत. आमदारांना याबाबत अपग्रेड करण्याचा प्रयत्न करणार आहोत. निवडून न येण्याच्या कारणांपैकी एक कारण हे मराठा समाजाची मते न मिळणे हे आहे, असंही चंद्रकांत पाटील यांना सांगितलं.

# राज्यातील प्रत्येक होर्डिंगचे मंत्रालयातून होणार मॉनिटरिंग




**मुंबई :** घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेनंतर राज्य सरकार खडबडून जागे झाले आहे. राज्यातील प्रत्येक होर्डिंगचे मॉनिटरिंग मंत्रालयातून होणार आहे. एवढेच नाही तर होर्डिंगसंदर्भातले निकष राज्य सरकार ठरवणार आहे. होर्डिंगची परवानगी राज्य सरकारकडून घ्यावी लागणार आहे.

घाटकोपर होर्डिंग प्रकरणानंतर अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे. तसेच दिलेल्या निकषाचे पालन हे संबधित संस्था किंवा कंपनी यांच्याकडून योग्य पालन होत आहे का? याचाही आढावा घेतला जाणार आहे.

घाटकोपर होर्डिंग प्रकरणानंतर अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे.

राज्यात लागणारे होर्डिंग हे एमएमआरडीए, एमएसआरडीसी, किंवा रेल्वेच्या हद्दीत जरी असले तरी त्याचे निकष आणि परवानगी राज्य सरकारकडून घेणे गरजेचे राहणार आहे. संबंधित होर्डिंग लावण्याबाबतचे निकष हे राज्य सरकारकडून ठरवले जाणार आहे.

दिलेल्या निकषाचे पालन हे संबधित संस्था किंवा कंपनी यांच्याकडून योग्य पालन होत आहे का ? याचाही आढावा घेतला जाणार आहे. लवकरच याबाबत राज्य सरकारकडून अधिकृतरित्या घोषणा केली जाणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

घाटकोपर दुर्घटनेच्या महिन्याभरानंतर होर्डिंगबाबत पालिका प्रशासनाला जाग आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने साल २०१७ मध्ये दिलेल्या आदेशांच्या अंमलबजावणीला सुरूवात झाली आहे.

तसेच मुंबईतील सर्व होर्डिंगची वॉर्डनिहाय माहिती सादर करण्याचे निर्देश देखील झाले आहेत. होर्डिंगबाबतचा परवाना, आकारमान, डिजिटल होर्डिंग चालू ठेवण्याची वेळ मर्यादा या गोष्टी तपासल्या जाणार आहे. डिजीटल होर्डिंग रात्री ११ पर्यतच चालू ठेवण्याची मुभा आहे.

प्रत्येक होर्डिंगवर माहिती देणारा क्यू आर कोड लावणे कंपनीला बंधनकारक आहे.

# काँग्रेसच्या मेळाव्यात भालके समर्थकांचे नाराजीनाट्य

**प्रणिती शिंदे निवडून येण्यात पंढरपूरकरांचा मोठा वाटा**

**सोलापूर लोकसभा मतदारसंघातून प्रणिती शिंदे निवडून येण्यात पंढरपूरकरांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे खासदार प्रणिती शिंदे यांनी माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा कृतज्ञता मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याच्या निमित्ताने पंढरपूर शहरात आणि कार्यक्रमाच्या ठिकाणी बॅनरबाजी करण्यात आली होती. मात्र या बॅनरवर आमदार भारत भालके व त्यांचे पुत्र भगीरथ भालके यांचे छायाचित्र छापण्यात आले नव्हते त्यामुळे भालके समर्थकांनी खासदार प्रणिती शिंदे यांना थेट जाब विचारत घोषणाबाजी करत गोंधळ घातला.**

**सोलापूर :** आपल्याला भरघोस मतांनी विजयी केल्याबद्दल आज सोलापूर लोकसभेच्या नूतन खासदार प्रणिती शिंदे या पंढरपूरकरांचे आभार मानण्यासाठी आल्या असता केवळ बॅनरवर फोटो नसल्याने नाराजीनाट्य समोर आले. यावेळी खासदार शिंदे यांच्या समोरच जोरदार घोषणाबाजी सुरु झाल्याने काँग्रेसमधील गटबाजी देखील समोर आली. त्या बॅनरवर दिवंगत आमदार भारत भालके यांचा फोटो नसेल तर तातडीने लावा अन्यथा मी कार्यक्रमाला हॉलमध्ये येणार नसल्याचे सांगितल्यावर त्याच बॅनर वर कोपऱ्यात भालके यांचा फोटो चिटकविण्यात आला आणि मग कार्यक्रम सुरळीत पार पडला.

काँग्रेसचे खासदार प्रणिती शिंदे यांनी आज पंढरपुरात आयोजित केलेल्या पहिल्याच कृतज्ञता मिळाव्यात ही अंतर्गत गटबाजी समोर आल्याने चांगल्या कार्यक्रमाला गालबोट लागले. राज्यात ज्या प्रमाणे यावेळी मोदी सरकारच्या विरोधात लाट निर्माण होऊन जनतेने निवडणूक हातात घेतली होती.तीच परिस्थिती सोलापूर जिल्ह्यात देखील यावेळी महाविकास आघाडीला मिळालेली मते हि जनतेच्या असंतोषाची होती. मात्र आता विजय झाल्यानंतर श्रेयवादाची लढाई सुरु झाल्यानेच आजचे नाराजीनाट्य समोर आले. आज खासदार प्रणिती शिंदे व सुशीलकुमार शिंदे पंढरपूर येथे या कृतज्ञता मेळाव्यासाठी आल्यावर भगीरथ भालके यांच्या कार्यकर्त्यांनी पोस्टरवर भालके यांचा फोटो नसल्याने जोरदार घोषणाबाजी सुरु केली.

बॅनरवर भालके यांचा फोटो चिटकवल्यावर कार्यक्रम सुरळीत पार पडला

खरेतर या कार्यक्रमाच्या बॅनरवर केवळ राष्ट्रीय व राज्यस्तरीय नेत्यांचे फोटो लावण्यात आले होते. मात्र प्रणिती शिंदे कार्यक्रमस्थळी पोहचताच भालके गटाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजीला सुरुवात केल्याने प्रणिती शिंदे या कार्यकर्त्यांच्या जवळ पोहचल्या. त्यांच्याशी संवाद साधल्यावर त्यांनी आयोजकांना तातडीने एकतर या बॅनरवर भालके यांचा फोटो लावा अन्यथा तो पूर्ण बॅनर मागून काढून टाका असा आदेश दिला. जर यातील काही न झाल्यास आपण कार्यक्रमाला येणार नसल्याचे सांगितले. यावेळी भगीरथ भालके हे देखील या ठिकाणी पोहचले आणि त्यांनी कार्यकर्त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. यानंतर त्याच बॅनरवर भालके यांचा फोटो चिटकवल्यावर कार्यक्रम सुरळीत पार पडला.

## संपादकीय

# पेरणीची घाई नको !



महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मान्सून अद्याप पोहोचलेला नाही. काही भागात दमदार आगमन झाले, असे वाटत असतानाच कोरडे दिवस दिसत आहेत.

मान्सून वेळेवर आल्याने पेरण्या सुरू झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या, तरीही हा पाऊस पुरेसा नाही. दर पाच-सहा वर्षांनी जून महिन्यात मान्सूनचे वेळेवर आगमन होते. सरासरी २०९ मिलीमीटर अपेक्षित असताना गेल्यावर्षी देशात ११३ मिलीमीटर पाऊस झाला होता. जुलैमध्ये सरासरीच्या दीडपट अधिक पाऊस झाला. ऑगस्टमध्ये सरासरीच्या निम्मा देखील झाला नव्हता. याउलट मान्सूनचा कालावधी संपल्यानंतर ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये अधिक पाऊस झाला. हा सारा प्रकार हवामान बदलाचा परिणाम आहे, असे मानले जाते. हवामानशास्त्र विभागाच्या म्हणण्यानुसार, १९७१ ते २०२० या पन्नास वर्षांत पाऊस आणि तापमानात वेगाने बदल जाणवत आहेत. तापमान वाढले आहे आणि पाऊस पडण्याची सरासरी बदलते आहे. त्याचा थेट परिणाम महाराष्ट्रातील शेतीवर होतो आहे. राज्यातील सुमारे ७७ टक्के शेती निसर्गावर अर्थात मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे.

सिंचनाखालील सरासरी क्षेत्र २२ ते २३ टक्के असले तरी पाऊसमान कमी-अधिक झाल्यास पाण्याच्या साठ्यावर विपरीत परिणाम होतो. शेतकऱ्यांना पुरेशी माहिती देण्याची यंत्रणा अपुरी असल्याने आकाश भरून आले की, अंदाजावर पेरण्या करण्याची घाई केली जाते.

मान्सूनचा हंगाम १ जून ते ३० सप्टेंबर असला तरी त्यातील एक-दोन महिने पाऊस कमी-अधिक होण्याचे प्रमाण वाढले आहे. गतवर्षी जुलैमध्ये सरासरीच्या १५१ टक्के अधिक पाऊस झाला आणि ऑगस्टमध्ये ५६ टक्के कमी झाला. त्याचा परिणाम खरीप पिकांवर झाला.

महाराष्ट्रात सुमारे एक कोटी एकर क्षेत्रावर कापूस आणि तेवढ्याच क्षेत्रावर सोयाबीन पीक घेतले जाते. त्याच्या वाढीवर परिणाम होऊन उत्पादन घटले. सोयाबीनचे उत्पादन घटून देखील दरवाढ झाली नाही. चार हजार ते साडेचार हजार प्रतिक्विंटल भावानेच सोयाबीनची विक्री झाली. कापूसही उचलला गेला नाही. विदर्भ आणि खान्देशातील शेतकऱ्यांनी कापूस वर्षभर घरातच साठवून ठेवला होता. अनेकांचा कापूस खराब झाला. या हवामानातील बदलाचा परिणाम पीक पद्धतीवर देखील होत आहे. २००१ ते २०२१ या दोन दशकांच्या एका अभ्यासाच्या निष्कर्षानुसार सोयाबीन, ऊस, कांदा आदी पिकांच्या क्षेत्रात वाढ होत आहे. मात्र, खरीप ज्वारी, भुईमूग, कडधान्ये यांचे क्षेत्र झपाट्याने कमी होत असल्याचे या अभ्यासाचे निष्कर्ष आहेत. पश्चिम महाराष्ट्रात या दोन दशकांत ज्वारी, भात, मका, कडधान्ये आदी पिकांचे क्षेत्र घटत आहे. याउलट उसाच्या लागवडीचे क्षेत्र पंचवीस टक्क्यांनी वाढले आहे. ज्वारी, बाजरी, नाचणी आणि कडधान्ये यासारखी पिके पुढील काही वर्षांत महाराष्ट्रातून हद्दपार झाली तर आश्चर्य वाटायला नको. या पार्श्वभूमीवर सरकारने अधिक सूक्ष्म नियोजन करून ही पिके किफायतशीर कशी होतील आणि त्यांचे बदलत्या हवामानानुसार संवर्धन कसे करता येईल, याचा विचार केला पाहिजे.

अन्यथा पुढील दहा वर्षांत ज्वारी किंवा बाजरीची भाकर खाणे चैनीची बाब ठरेल. आश्चर्य म्हणजे भाताचे आगर असलेल्या सह्याद्री पर्वतरांगाच्या बाजूच्या पट्ट्यात तसेच कोकणात भात पिकाचे क्षेत्र झपाट्याने कमी होते आहे. मराठवाड्यात रब्बी हंगामातील पीक पद्धतीत मोठे बदल जाणवत आहेत.दुबार पेरणी किंवा नापिकीच्या धोक्यापासून वाचण्यासाठी हवामान बदलाचा चांगला अभ्यास करून पर्जन्यमानाचा अंदाज अचूक वर्तविण्याची गरज आहे. आभाळाकडे किंवा ढगांकडे पाहून पेरण्या करण्याचे दिवस संपले. शेतकऱ्यांच्या पारंपरिक ज्ञानाला मर्यादा येऊ लागल्या आहेत. हवामान विभागाने यावर्षी जूनचा पाऊस सरासरीप्रमाणे होईल,

मात्र जुलैमधील पावसात अंतर पडेल, अशी शक्यता व्यक्त केलेली आहे. गतवर्षी तेच झाले होते. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये अनेक भागांत कोरडाच पडला. खरीप पिकांनी माना टाकल्या आणि उशिरा झालेल्या उत्तर मान्सून पावसामुळे रब्बी हंगामही साधता आला नाही. महाराष्ट्रातील केवळ तीन जिल्ह्यांत सरासरीपेक्षा थोडा अधिक पाऊस झाला. आठ जिल्ह्यांत सरासरीपेक्षा कमी झाला आणि उर्वरित अठ्ठावीस जिल्ह्यांत सरासरी कशीबशी गाठली. राज्य सरकारने दुष्काळ केवळ जाहीर केला. थोड्या फार सवलती दिल्या. केंद्र सरकारने केवळ तोंडदेखली पाहणीच केली. मदत मात्र दिलीच नाही. पश्चिम महाराष्ट्रातील चार आणि मराठवाड्यातील चार जिल्हे दुष्काळाचे चटके खातच निवडणुकांना सामोरे गेले. यावर्षी तरी पावसाचा अंदाज पाहूनच पेरण्या करणे बरे ! आपल्याला घाई परवडणारी नाही.

# भोरला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटली



**भोर :** भाटघर धरणामधून भोर शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी बुवासाहेबवाडी, ता. भोर येथे रस्त्याचे काम करीत असताना जेसीबीने फुटल्याने जलवाहिनीतून हजारो लिटर पाणी वाया जात असल्याने ऐन खरीप हंगामाच्या तयारीत घातीला मशागत करण्याच्यावेळीच शेतात पाणी गेल्यामुळे शेतकऱ्याचे शेतीचे मोठे नुकसान झाले.

भाटघर जलाशयातून परिसरातील आठ गावांना तसेच भोर शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो.भाटघर धरणापासून भोर शहराकडे ३ किलो- मीटर अंतरावर जलवाहिनीने पाणी वितरण केले जाते १० एचपी मोटरच्या साह्याने आठ इंच पाईपलाईन द्वारे शहरात पाणीपुरवठा होतो.गुरुवार (दि.१३) रोजी कापूरव्होळ-भोर मार्गावरील बुवासाहेबवाडी येथील पुलाजवळ रस्त्याचे काम करीत असताना जेसीबी चालकाकडून जलवाहिनी फुटली गेली,

या जलवाहिनी तून जवळजवळ एक तास पाणी तुषार सिंचनासारखे बाहेर फेकले जात होते.वाया गेलेले पाणी शेतकऱ्याच्या भात तरवा टाकलेल्या शेतात तुंबल्याने शेतकऱ्या चे मोठे नुकसान झाले. काही वेळाने नगरपालिका प्रशासन तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तुटलेली जलवहिनी दुरुस्त करण्याचे काम सुरू केले.

मागील दोन ते तीन दिवसांपूर्वी बुवासाहेबवाडी जवळ रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराला रस्त्याच्या बाजूने जलवाहिनी गेल्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी बेजबाबदारपणे काम केल्याने भोर शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटली गेली. तात्काळ नगरपरिषदेने फुटलेल्या जलवाहिनी दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.असे नगरपरिषद मुख्याधिकारी श्रीराम पवार यांनी सांगितले.

# फुटपाथवर आईसोबत झोपलेल्या तान्ह्या बाळाचे अपहरण

## बारा तासात पोलिसांकडून गुन्ह्याची उकल

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याच्या अत्यंत वैभवशाली व प्राचीन परंपरांचा वारसा पुढे नेण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माध्यमातून होत आहे. मविकसीत भारतफ्चे ध्येय आपणास साकार करावयाचे असेल तर आगामी दहा वर्षात देशातील मटॉप ५०फ विद्यापीठामध्ये क्रमांक मिळविण्याचे ध्येय समोर ठेवून काम करा, असे आवाहन कुलपती तथा राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६४ वा दीक्षांत समारंभ कुलपती तथा राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली व मएनसीएलफ्चे संचालक डॉ.अशिष लेले यांच्या प्रमुख आज थाटात संपन्न झाला. कुलपती रमेश बैस हे मराजभवनाफ्तून य सोहळ्यात दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले.

आज सकाळी १० वाजता या सोहळ्याचे आयोजन विद्यापीठाच्या नाट्यगृहात करण्यात आले होते. कुलगुरु डॉ.विजय फुलारी, प्र कुलगुरु डॉ. वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ.भारती गवळी, प्रभारी वित्त व लेखाधिकारी डॉ.संजय कवडे, अधिष्ठाता डॉ.एम.डी.शिरसाठ, डॉ.संजय साळुंके, डॉ.वैशाली खापर्डे, डॉ.बीना हुबे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.गजानन सानप, काशिनाथ देवधर, डॉ.भगवान साखळे, प्राचार्य डॉ.भारत खंदारे, डॉ.रविकिरण सावंत, डॉ.अंकुश कदम, नितीन जाधव, डॉ.योगिता होके पाटील, ॲड.दत्तात्रय भांगे, डॉ.व्यंकट लांब, डॉ. अपर्णा पाटील आदी उपस्थित होते.

याप्रसंगी ऑक्टोबर नोव्हेंबर २०२२ व मार्च-एप्रिल २०२३ मध्ये उत्तीर्ण झालेल्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना तसेच २७ जून २०२३ ते आजतागायत पीएच.डी प्राप्त १३९ संशोधकांना पदव्यांचे वितरण करण्यात आले.

शोधा म्हणजे सापडेल डॉ.अशिष लेले

एका बाजूला ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे जगामध्ये प्रचंड बदल झाले आहेत.

तथापि आजच्या जगात अनेक प्रकारची गुंतागुंत असून विविध प्रश्नही निर्माण झाले आहेत.

सर्व प्रश्नांवर उत्तरे शोधण्याचे आणि नवी दिना देण्याचे काम तरुण्यांचे आहे. आपल्यासाठी संधीचे एक दार बंद झाले तर दुसरे उघडायचे असते. एक रस्ता बंद झाला असेल तर दुसरा नवा मपथफ शोधून ध्येयपूर्ती करायची असते. आयुष्यात मपर्पजफ, मप्रिजर्व्हन्सफ व मपॅशनफ हे तीन पीफ महत्त्वाचे आहेत, याची जाणीव ठेवा, असे आवाहनही एनसीएलचे संचालक डॉ.अशिष लेले यांनी केले.

**समाजाभिमुख संशोधनास प्राधान्य कुलगुरू**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे मफर्स्ट जनरेशन ग्रॅज्युटस्फ घडविणारे विद्यापीठ म्हणून ओळखले जाते. पारदर्शक प्रशासन, उच्च शैक्षणिक दर्जा, समाजाभिमुख संशोधन यासाठी विद्यार्थी हिताच्या दृष्टीने विद्यापीठाने काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. नवीन शैक्षणिक धोरणात अपेक्षित असलेला मआंतर विद्या शाखीय दृष्टीकोनफ समोर ठेऊन आम्ही अध्ययन, संशोधनावर दिला आहे.केंद्र शासनाने प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान अर्थात पीएम उषा प्रकल्पातंर्गत शंभर कोटींचा निधी घोषित केला आहे. अत्यन्त उत्तम रितीने आम्ही हा प्रकल्प राबविणार आहोत. शिक्षणासोबतच संशोधन हेही महत्त्वाचे आहे.

विद्यापीठाने मरिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सेलफ स्थापन केला असून मसंशोधन व नवोन्मेषफ समाजपयोगी असावे या हेतून संशोधन प्रकल्प राबविण्यात आले. विद्यापीठ निधीतून हा महत्वाकांक्षी प्रकल्प सुरु करण्यात आला आहे.

चालू शैक्षणिक वर्षात केमिकल टेक्नॉलॉजी या विभागाने मएनबीएफ्चे मानांकन मिळविले आहे. या सर्व सकारात्मक बाबी समोर ठेऊन विद्यापीठाने प्रगतीच्या दिशेने टेकऑफ घेतला आहे, असे कुलगुरू डॉ विजय फुलारी स्वागतपर भाषणात म्हणाले.

## कालबाह्य अधिनियमांचे निरसन करावे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे



**मुंबई :** महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना राज्यातील कालबाह्य अधिनियमाचे निरसन करण्याचे निदेश सभागृहात दिले होते.

या निदेशाच्या अनुषंगाने व विधि सेंटर फॉर लिगल पॉलीसी या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या अहवालातील कालबाह्य झालेल्या २१ कायद्यांना निरसित करावे किंवा कसे याबाबत शासनाने गांभिर्याने लक्ष घालावे, अशा आशयाचे सूचनेचे पत्र डॉ. गोऱ्हे यांनी उपमुख्यमंत्री (विधी व न्याय), महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे.

# आदिवासी विकास विभागाच्या पदभरतीस तुर्तास स्थगिती

**मुंबई :** पदभरती करताना सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (एसईबीसी) या संवर्गाचा समावेश करून नव्याने जाहिरात प्रसिद्ध करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. त्यामुळे आदिवासी विकास विभागातील क्षेत्रीय कार्यालयाकडून पुनःश्च बिंदुनामावली अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामुळे या विभागाची दि.२३ नोव्हेंबर २०२३ रोजी दिलेली पदभरती जाहिरात तूर्त स्थगित करण्यात आली असल्याचे आदिवासी विभागाच्या आयुक्त नयना गुंडे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

आदिवासी विकास विभागातील ६०२ विविध रिक्त पदांकरिता २३ नोव्हेंबर २०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या पदभरतीत जाहिरातीनुसार २३ नोव्हेंबर २०२३ ते १३ डिसेंबर २०२३ या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आलेले होते.

विविध पदांकरिता उमेदवारांचे अर्जही ऑनलाईन प्राप्त झाले होते.

तथापि दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) या संवर्गाचा समावेश करून त्यानुसार बिंदुनामावली अद्ययावत करून गट क संवर्गासाठी जाहिरात पुनश्च प्रसिद्ध करण्याबाबत शासनस्तरावरून सूचित करण्यात आले आहे. ही जाहिरात तुर्तास स्थगित करण्यात आली असून, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत आदिवासी विकास विभागातील क्षेत्रीय कार्यालयाकडून पुनश्च बिंदुनामावली अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू असल्यामुळे त्यानंतर याबाबतची पुढील कार्यवाही सविस्तर कळविण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# महायुतीत फाटाफूट



**मुंबई :** राज्यात विधानपरिषदेच्या चार जागांसाठी निवडणूक होणार आहे. २६ जून रोजी विधानपरिषदेसाठी मतदान होणार आहे. दरम्यान, अर्ज माघार घेण्याच्या दिवशी अनेक नाट्यमय घडामोडी घडत आहे. विधानपरिषदेच्या या निवडणुकीत महाविकास आघाडीने जुळवुन घेतलं आहे. मात्र महायुतीत फाटाफूट पडल्याचं चित्र आहे. मुंबई शिक्षक मतदार संघात तीन पक्षांचे उमेदवार आमने सामने आहेत. मविआच्या एका उमेदवाराविरुद्ध महायुतीचे तिघेजण मैदानात उतरले आहेत.

मविआमध्ये कोकणसह इतर मतदारसंघात बिनसल्याचं चित्र होतं. काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. पण उद्धव ठाकरे यांनी किशोर जैन यांची कोकण पदवीधर मतदारसंघातली उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेतला. दुसरीकडे काँग्रेसने नाशिक शिक्षक मतदारसंघात उमेदवारी मागे घेतली.

तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अमित सरैया यांनी उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेतला. मुंबई शिक्षक मतदारसंघातही काँग्रेसच्या प्रकाश सोनवणे यांनी अर्ज मागे घेतल्याने मविआमधली अंतर्गत धुसफूस मिटली. मुंबई शिक्षक मतदारसंघात महायुतीत मात्र फाटाफूट असल्याचं समोर आलंय. महायुतीच्या तीन पक्षांकडून तीन उमेदवारांना रिंगणात उतरवण्यात आलं आहे. मुंबई शिक्षक मतदारसंघात महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाने ज. मो अभ्यंकर यांना उतरवलं आहे. तर भाजपने शिवनाथ दराडे, राष्ट्रवादी काँग्रेसने शिवाजीराव नलावडे आणि शिवसेना पुरस्कृत शिवाजी शेंडगे हे लढणार आहेत. यामुळे ठाकरे गटाच्या एका उमेदवाराविरुद्ध महायुतीचे तिघे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

# शिवरे रींगरोड जमिनीची मोजणी शेतकऱ्यांच्या विरोधामुळे तुर्तास रद्द

## शेतकऱ्यांच्या हरकती जाणून घेतल्यानंतर कारवाई होणार

**भोर :** पुणे-सातारा महामार्गावरील शिवरे (ता. भोर) गावातून जाणाऱ्या रिंगरोडसाठी जमिनीची मोजनी गुरुवार (दि.१३) होऊन भूसंपादन होणार होते मात्र शिवरे ग्रामस्थांनी या रिंगरोड बाबत विविध प्रकारची आंदोलने करत वारंवार विरोध दर्शवला होता. त्यांनतर रिंगरोडसाठी बागायती क्षेत्रातून जाणाऱ्या जमिनीची मोजणी करण्याबाबत तारीख शासनाकडून ठरवल्यात आल्यानंतर गावातील शेतकऱ्यांनी व कृती समितीने मंगळवार (दि. ११ जून) तातडीची बैठक घेऊन जमीन मोजणीला विरोध दर्शिविला होता.


शेतकऱ्यांचा रोष पाहता एमएसआरडीच्या अधिकाऱ्यांकडून शिवरेतील जमिन मोजणीची कार्यवाही रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तूर्तास दिलासा मिळाला आहे.

दरम्यान रिंगरोड साठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून जमिनी मोजणीच्या नोटीसा शेतकऱ्यांना बजावण्यात आल्या होत्या. मात्र त्या नोटीसा शेतकऱ्यांनी स्वीकारल्या नव्हत्या.

यानंतर गुरुवारी भूसंपादन होणार होते. परंतु कोणत्याही परिस्थितीत मोजणी होऊन देणार नसल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला होता त्यामुळे तूर्तास भूसंपादनासाठी जमिनीच्या मोजण्या थांबवण्यात आल्या असून शेतकऱ्यांच्या नव्याने हरकती जाणून घेणार आहोत त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र रस्ते व विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

# सर्वच धारावीकरांचे धारावीतच पुनर्वसन करावे

## धारावी पुनर्विकासाच्या मुद्द्यावरून महाविकास आघाडी आक्रमक



**मुंबई :** धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेडने (डीआरपीपीएल) धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत मार्चपासून सर्वेक्षणाचे काम सुरू केले आहे. मात्र हे सर्वेक्षण दहशतीच्या वातावरणात होत असून धारावीकरांनी या दहशतीला न जुमनता सर्वेक्षण थांबविले आहे. जोपर्यंत सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्याचा, धारावीकरांना ५०० चौ. फुटाचे घर देण्याचा आणि सरसकट धारावीकरांना धारावीतच घरे देण्याचा निर्णय होत नाही तोपर्यंत सर्वेक्षण होऊ देणार नाही, असा इशारा खासदार वर्षा गायकवाड यांनी दिला आहे. तर धारावीच्या नावाखाली मुंबईतील जमिनी अदानीच्या घशात घालण्याचा प्रयत्न सुरू असून हा मोठा भूखंड घोटाळा असल्याचा आरोपही त्यांनी केला.

धारावीतील रहिवाशांच्या पात्रता निश्चितीसाठी मार्चपासून सर्वेक्षण सुरू आहे. रहिवाशांना विश्वासात न घेता, दहशतीच्या वातावरणात सर्वेक्षण होत असल्याचा आरोप करीत सोमवारी धारावीकरांनी नाईक नगरमधील सर्वेक्षण बंद पाडले. पुन्हा मंगळवारी सर्वेक्षणास आलेल्या अदानीच्या पथकाला धारावीकरांनी नाईक नगरमधून हुसकावून लावले. त्यानंतर नाईक नगरमधील सर्वेक्षण थांबविले. तर दुसरीकडे राज्य सरकारकडून डीआरपीपीएलला कुर्ल्यातील २१ एकर जागा अपात्र रहिवाशाच्या पुनर्वसनासाठी देण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. एकूणच दहशतीखाली होत असलेल्या सर्वेक्षणाच्या आणि अदानीला मुंबईतील जागा देण्याच्या मुद्द्यावरून महाविकास आघाडी आक्रमक झाली आहे. शुक्रवारी खासदार वर्षा गायकवाड आणि खासदार अनिल देसाई यांनी धारावीकरांच्या शिष्टमंडळासह वांद्र्यातील धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या (डीआरपी) कार्यालयात डीआरपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.व्ही.आर. श्रीनिवास यांची भेट घेतली. यावेळी निवृत्त पोलीस अधिकारी, निवृत्त सैनिक आणि गुंडाच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात येत असल्याचा आरोप गायकवाड यांनी केला. आम्ही सध्या हे सर्वक्षण बंद पाडले असून हे सर्वक्षण बंद करावे, अशी मागणी यावेळी गायकवाड आणि देसाई यांनी श्रीनिवास यांच्याकडे केली. यासंबंधीचे निवेदन श्रीनिवास यांना देण्यात आले.

सर्वेक्षण राज्य सरकारच्या यंत्रणेच्या माध्यमातून व्हावे, अशी मागणी यावेळी धारावीकरांनी केली. महत्त्वाचे म्हणजे आमच्या अनेक मागण्या प्रलंबित असताना सर्वेक्षण करण्यात येत असून हे सर्वेक्षण आम्हाला मान्य नसल्याची भमिका यावेळी धारावी बचाव आंदोलनाच्या शिष्टमंडळाने घेतली. तर ५०० चौरस फुटाच्या घराची आणि सरसकट धारावीकरांचे, अपात्र धारावीकरांचे धारावीतच पुनर्वसन करण्याचा निर्णय होत नाही, तोपर्यंत धारावी पुनर्विकासाचे काम, सर्वेक्षण होऊ देणार नाही,

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# वाठार स्टेशन सहाय्यक पोलिस निरिक्षकपदी अविनाश माने यांची नियुक्ती



**आसनगाव :** जिल्हा पोलिस अधिक्षक समीर शेख यांच्या आदेशान्वये वाठार स्टेशन पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक म्हणून अविनाश माने यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर वाठार स्टेशन पोलिस ठाण्याचे तत्कालीन सहाय्यक पोलिस निरिक्षक अशोक हुलगे यांना फलटण येथे पूर्व पदावर नियुक्त करण्यात आले आहे.

नवनियुक्त सहाय्यक पोलिस निरिक्षक अविनाश माने मूळचे सोलापूर येथील रहिवासी असून गेल्या १३ वर्षात पोलिस खात्यात त्यांनी बृन्हमुंबई,सोलापूर,कोल्हापूर जिल्ह्यातील विविध पोलीस

ठाण्यात उत्कृष्ट सेवा बजावली आहे.गुन्हे प्रकटीकरण कार्यात त्यांचा नावलौकिक असून अनेक गुन्ह्यांची उकल करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

दरम्यान ग्राम सुरक्षा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करत परिसरात कडक कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष कार्यवाही करत जिल्हा पोलिस प्रशासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या उंच भरारी यांसारख्या समाजिभिमुख योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे नवनियुक्त सहाय्यक पोलिस निरिक्षक अविनाश माने यांनी सांगितले.

# आनंदराव लेंभे यांचे निधन



**आसनगाव :** पिंपोडे ब्रुद्रुक येथील प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प.आनंदराव सखाराम लेंभे ( शास्त्री नाना) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेचे संस्थापक व सातारा जिल्हा बँकचे संचालक रामभाऊ लेंभे यांचे ते वडील होते.त्यांच्या पश्चात सून, विवाहित मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. पिंपोडे ब्रुद्रुक परीसरात शास्री नाना या नावाने परीचीत होते.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत १ कोटी रूपये किंमतीचा गांजा जप्त

**मुंबई :** उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने पनवेल मुंब्रा महामार्गाच्या डाव्या बजूस, स्टार वेल्डींग वर्क्सच्या समोर, तळोजे पाचनंद, तळोजे नवी मुंबई येथे कारवाई करीत १ कोटी रूपये किंमतीचा अंमली पदार्थ गांजा जप्त केला. या कारवाईमध्ये आरिफ जाकीर शेख (वय २५ वर्ष) व परवेझ बाबुअली शेख (वय २९) दोन्ही रा. सायन कोळीवाडा मुंबई यांच्याविरूद्ध एनडीपीएस कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

या गुन्ह्यामध्ये आंतरराज्यीय टोळी असण्याची दाट शक्यता आहे.

या गुन्ह्यातील आरोपींकडून पांढऱ्या रंगाच्या नॉयलॉन गोण्यामध्ये ४१४ किलो १ कोटी १३ लाख ९० हजार रूपये किंम तीचा गांजा मिळून आला आहे. त्याचबरोबर वाहन व मोबाईल असा मुद्देमाल एनडीपीएस (नॉर्को टीक्स ड्रग अँड सायकोट्रॉपीक सबस्टान्सेस ॲक्ट) कायद्यान्वये जप्त करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे, कोकण विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार, रायगड अधीक्षक आर. आर. कोले यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

ही कारवाई निरीक्षक उत्तम आव्हाळ, आर. डी पाटणे, दुय्यम निरीक्षक डी. सी लाडके, एन. जी. निकम, प्रवीण माने, सहायक दुय्यम निरीक्षक जी. सी. पालवे, तसेच जवान श्रीमती आर. डी. कांबळे, श्रीमती निशा ठाकूर, ज्ञानेश्वर पोटे, सचिन कदम यांच्या पथकाने केली. या गुन्ह्याचा पुढील तपास अधिक्षक श्री. कोले यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक आर. डी. पाटणे करीत आहेत, असे कोकण उपआयुक्त प्रदीप पवार यांनी कळविले आहे.

# क्षेत्र महाबळेश्वरात छ.उद्यनराजे भोसले यांना शशिकांत शिंदेच्या तुलनेत सर्वाधिक मतदान

## क्षेत्र महाबळेश्वरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे आव्हान

**क्षेत्र महाबळेश्वर :** लोकसभेला शशिकांत शिंदे व छ.उद्यनराजे भोसले यांच्यात चुरशीची लढत पहावयास मिळाली. या लढतीत उदयनराजे भोसले यांनी मताधिक्य मिळवत विजय खेचून आणत बाजी मारली .यामध्ये महाबळेश्वर तालुक्यातील क्षेत्र महाबळेश्वर येथून छ. उद्यनराजे भोसले यांना शशिकांत शिंदे यांच्या तुलनेत जास्त मतदान मिळाले असून मतदारांनी छ.उद्यनराजे भोसले यांच्यावर विश्वास दाखवला



आहे त्यामुळे आगामी काळात छ. उद्यनराजे भोसले यांना क्षेत्र महाबळेश्वर येथील प्रलंबित असणारे प्रश्न मार्गी लावण्याचे आव्हान समोर असणार आहे.चुरशीच्या झालेल्या या लढतीत क्षेत्र महाबळेश्वर येथून उद्यनराजे भोसले यांना ३६५ तर शशिकांत शिंदे यांना ११३ मतदान झाले आहे.

क्षेत्र महाबळेश्वर येथील मतदारांनी छ.उद्यनराजे भोसले यांना जास्तीचे लिड देत लोकसभेसाठी छ.उद्यनराजे भोसले यांच्यावर विश्वास दाखवला आहे.

क्षेत्र महाबळेश्वरला ऐतिहासिक वारसा लाभला असून याठिकाणी दरवर्षी अनेक पर्यटक भेट देत असतात त्यामुळे येथील विकासाच्या दृष्टीने,नवीन रोजगाराच्या दृष्टीने याठीकाणी काय काय करता येईल यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे.जावलीचे भूमिपुत्र असताना देखील आणि याठीकाणाहून प्रतिनिधित्व केलेल्या शशिकांत शिंदेचा येथील जनतेशी संपर्क कायम होता त्यांनी जवळपास दहा वर्षे याठीकाणाहून नेतृत्व केले होते.तरीदेखील परीसरातील जनतेने छ.उद्यनराजे भोसले यांच्यावर विश्वास दाखवत जास्तीचे लिड दिले त्यामुळे या परीसरातील जनतेच्या अडिअडचणी आणि प्रलंबित असणार्या प्रश्नावर छ.उद्यनराजे भोसले यांनी प्रयत्नशील रहावे अश्या प्रतिक्रिया सर्वसामान्य नागरिक व्यक्त करीत आहे.

### छ.खा.उद्यनराजे भोसले यांच्यासाठी कार्यकर्त्यांचे प्रामाणिक काम

**जावलीचे भुमिपुत्र आणि याठीकाणाहून जवळपास १० वर्षे केलेले प्रतिनिधित्व आणि जनतेशी असलेला जनसंपर्क यामुळे याठीकाणी शशिकांत शिंदे यांची पकड होती.शशिकांत शिंदे यांना रोखण्याचे मोठे आव्हान याठिकाणी होते.छ.उद्यनराजे भोसले यांच्यासाठी कार्यकर्त्यांनी चांगलीच कंबर कसत प्रामाणिक काम याठीकाणी केले आहे.किंचतसा अपवाद वगळता सर्वांनी मन लावून काम केले आहे.कार्यकर्त्यांनी केलेल्या निस्वार्थी कामाला निश्चित न्याय मिळेल अशी आशा व्यक्त केली जात आहे.**

# आगामी विधानसभा निवडणूक महायुती कोणाच्या नेतृत्वात लढणार?

## मंत्री चंद्रकांत पाटलांनी थेटच सांगितले

**कोल्हापूर :** राज्यात होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुका महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच नेतृत्वाखाली लढवणार तसंच यंदाच्या लोकसभा निवडणुकीत त्रुटी भरुन काढून विधानसभेत त्या पूर्ण करु, शरद पवार जसं कार्यकर्त्यांना पंप मारतात तसं आम्ही पंप मारणार नसून वस्तुस्थितीला धरुन विचारमंथन होणार आहे, त्यामुळं विधानसभा निवडणुकीत महायुती भक्कम होऊन सर्वाधिक जागा जिंकेल, असा विश्वास मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला. ते आज कोल्हापुरात पत्रकारांशी बोलत होते.

**उद्धव ठाकरेंवर टीका :** यावेळी चंद्रकांत पाटलांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर टीका करत म्हटलं की, मफमाझं उद्धव ठाकरेंना प्रेमाचं विचारणं आहे की तुम्ही काय मिळवलत? तुम्ही १८ चे ९ झालात, काँग्रेस १ ची १३ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ४ जागेचा ८ झाला. मी नेहमी लॉजिकवर बोलत असतो आणि लॉजिक असं सांगतं की उद्धव ठाकरेंची पिछेहाट झालेली आहे. परिश्रम त्यांनी खूप घेतले, लोकसभा निवडणुकीला उध्दव ठाकरेंचा चेहरा वापरला, सगळ्यांनी अंधारात ठेवलं आणि त्यांना ९ जागेवर यश मिळालं. २०१९ ला त्यांनी मुख्यमंत्रीपदाच्या मोहापाई किंवा काही राजकीय घटना घडल्या त्याच्यावर मात करुन पुढे जायचे असते. मात्र, घडलेल्या या घटनांमुळे त्यांनी वेगळा मार्ग स्वीकारला त्यामुळे लोकांमध्ये ते आता कडक हिंदुत्ववादी राहिलेले नाहीत. प्रत्यक्षात त्यांचा पक्ष

फुटला लोकसभेत अठराच्या जागा ९ आल्या आता विधानसभेत ३० चे जागा दिसत आहेत.

तसंच आम्ही तिघेजण एकत्र येऊन राज्यात सरकार आणणार आहोत आणि या सरकारचे प्रमुख उद्धव ठाकरे असणार आहेत, असं संजय राऊत म्हणत आहेत. मात्र संजय राऊत हे कशाच्या आधारावर म्हणत आहेत असा सवाल ही चंद्रकांत पाटील यांनी विचारला.

**भाजपाकडून पराभवावर मंथन :** कोल्हापूर लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या संजय मंडलिकांचा पराभव झाल्यानंतर भाजपा आता या पराभवाची कारणं शोधत आहे.

त्यात सुधारणा करत विधानसभेच्या तयारीला लागली आहे. यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्वत: लक्ष घातलं असून कोल्हापुरातील भाजपा कार्यालयात आज दिवसभर विधानसभा मतदारसंघाप्रमाणे मॅरेथॉन बैठका पार पडल्या. यानंतर माध्यमांशी बोलताना, विधानसभा मतदारसंघात आपला परफॉर्मन्स कसा चांगला करता येईल याच्यावर विचारमंथन करण्यात आलं. ३ नोव्हेंबरच्या आसपास नवीन विधानसभा अस्तित्वात येईल, २० ऑक्टोबरच्या दरम्यान विधानसभा निवडणुका होतील. ४५ दिवस आधी प्रक्रिया सुरू होते. ५ सप्टेंबरच्या आसपास सर्व निवडणूक प्रक्रिया सुरू होणार आहे. यामुळं विधानसभेसंदर्भातलं नोटिफिकेशन लवकरच निघेल असं मंत्री चंद्रकांत पाटील म्हणालेत.

# तळा आणि म्हसळा नगरपंचायत प्रशासकीय इमारतीचा आराखडा तयार करावा : महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई :** रायगड जिल्ह्यातील तळा आणि म्हसळा नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाचा आराखडा तातडीने तयार करून इमारतीच्या कामाला गती द्यावी, असे महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यातील तळा आणि म्हसळा नगरपंचायत प्रशासकीय इमारती संदर्भात आज मंत्रालयात आढावा बैठक घेण्यात आली.

यावेळी तळा नगरपंचायतचे मुख्य अधिकारी विराज लबडे, म्हसळा नगरपंचायतचे मुख्य अधिकारी विठ्ठल राठोड व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

तळा आणि म्हसळा या दोन्ही नगरपंचायत इमारत कार्यालयासाठी जागा तसेच निधी मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचा आराखडा तयार करून यामध्ये लोकांसाठी सोयी सुविधांचा समावेश करावा. पिण्याचे पाणी, टॉयलेट, सौर ऊर्जा या सुविधांचा समावेश करून आराखडा तयार करावा अशा सूचनाही मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.

# श्रींची पालखी भौरदमध्ये दाखल; शहरात आगमन

**अकोला :** अकोलेकर भाविकांना ज्यांच्या दर्शनाची आस लागून आहे त्या शेगाव निवासी श्रीसंत गजाजन महाराज यांची पालखी शहरालगतच्या भौरद येथे गुरुवारी (१४ जून) दाखल झाली. वारकऱ्यांचा हा मेळा शनिवार, १५ जून रोजी राजराजेश्वरनगरीत दाखल होणार असून, माऊलींची दर्शन घेण्यासाठी हजारो अकोलेकरांची गर्दी उसळणार आहे.

भजनी मंडळ, टाळकरी, दिंडी, अश्व व ७०० वारकऱ्यांसह शेगाव येथून १३ जून रोजी निघालेला संत श्री गजानन महाराज यांचा पालखी सोहळा त्याच दिवशी सायंकाळी अकोला जिल्ह्यातील पारस येथे दाखल झाला. औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील श्रीराम मंदिर येथे रात्रभर मुक्काम करून श्रींची पालखी शनिवारी अकोल्याच्या दिशेने मार्गस्थ झाली. सायंकाळच्या सुमारास हा पालखी सोहळा भौरद येथे दाखल झाला. गावाच्या वेशीवर ग्रामस्थांनी पालखीचे भव्य स्वागत केले. या प्रसंगी आमदार रणधीर सावरकर यांनी उपस्थित पालखीचे दर्शन घेतले. या ठिकाणी डाबकी रोड व भौरद येथील शेकडो भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. त्यानंतर हा पालखी सोहळा गावात दाखल होऊन मुक्कामस्थळी विसावला.



आजचा मुक्काम मुंगीलाल बाजोरिया विद्यालय प्रांगणात

श्रींच्या पालखीचे स्वागत व रात्रीचा मुक्काम मुंगीलाल बाजोरिया विद्यालय प्रांगणात राहील. भक्तांना श्रींचे दर्शन व्हावे म्हणून अकोला शहराच्या मुख्य रस्त्याने श्रींच्या पालखीची शोभायात्रा काढण्यात येणार आहे. १५ जून रोजी दुपारी

# भोर तालुक्यातील २० हजार विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वाटप

**भोर :** सर्व शिक्षण अभियानांतर्गत भोर तालुक्यात शहरासह ग्रामीण भागातील पहिली ते आठवीच्या एकूण १९ हजार ५२९ विद्यार्थ्यांना यंदा मोफत पाठ्यपुस्तक योजनेचा फायदा होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १५ जूनला पाठ्यपुस्तके देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

येत्या शनिवारी १५ जूनला सुरू होणाऱ्या नवीन शैक्षणिक वर्षात शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक मिळावेत या दृष्टीने शिक्षण विभागाने नियोजन केले.भोर तालुक्यात३२५ शाळांना याचा लाभ होणार असून जिल्हा परिषद शाळा -२७४, अनुदानित खाजगी शाळा, नगरपालिका -३, आश्रम शाळा -२ तसेच समाज कल्याणच्या एका शाळेला विभागामार्फत पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात आली आहेत.

बहुतांशी शाळांची वर्ग स्वच्छता शालेय स्वच्छता करून घेतली गेली आहे.शाळेच्या पहिल्या दिवशी स्थानिक लोकप्रतिनिधी, पालक, ग्रामस्थ, अधिकारी शाळेत जाऊन मुलांचे स्वागत करून पाठ्यपुस्तकांचे वाटप करनार आहेत. तर शाळेत विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती ठेवण्यासाठी शिक्षक वृंद दोन दिवसांपासून गावात जाऊन पालकांच्या गाठीभेटी घेत आहेत. येत्या दोन दिवसात यंदाच्या शैक्षणिक वर्षातील शाळा सुरू होणार असल्याने मागील वर्षी शाळांमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आनंद व्यक्त होत आहे तर नवीन पहिल्यांदाच शाळेत जाणाऱ्या चिमुकल्यांमध्ये धाकधुकीचे वातावरण आहे.

पाठ्यपुस्तके वितरण करण्याचे नियोजन विषय तज्ञ सुनील गोरड, तानाजी तारू, प्रकाश बदक, विजय खुटवड , संतोष देशमुख, अंजली अहिरे, सुरेखा राजवडे, लता वाघोले यांनी इयत्ता व भाग निहाय केले.

**शाळा पूर्वतयारी पूर्ण झाली आहे. पहिल्या दिवशी आनंददायी उपक्रम राबवले जाणार असून नवागतांचे स्वागत गावातून प्रभात फेरी काढून पुष्पगुच्छ देत करण्यात येणार आहे. विद्यार्थी १०० टक्के उपस्थित होण्यासाठी पालकांमध्ये जनजागृती केली गेली आहे असे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती भोर राजकुमार बामणे यांनी सांगितले.**

# पराभूत होऊनही आम्ही जिंकलोय; नवनीत राणांनी सांगितले कारण,



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर नवनीत राणा यांनी पराभूत होऊनही आम्ही जिंकलो आहोत, कारण आमचे नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले आहेत असे म्हटले आहे. तसंच पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंना डिवचले असून आता तरी हनुमान चालीसा पठण केले पाहिजे असे म्हटले आहे. मी माझ्या क्षेत्रासाठी ज्या पद्धतीने काम केले त्यानंतर मला यंदा जनतेने का थांबवले हे कळले नाही राज्यात काम करायचे की कुठे हे अद्याप ठरवलेले नाही असेही त्यांनी सांगितले आहे.

दिल्ली दौऱ्यासंबंधी विचारण्यात आलं असता नवनीत राणा म्हणाल्या की, मफ्पंतप्रधान नरेंद्र मोदींची शपथ होती, मी भाजपाची कार्यकर्ता आहे, त्यामुळे दिल्लीत जाण्यात काहीही गैर नाही. यापूर्वीदेखील पाच वर्ष दिल्लीत होतीफ्फ पराभूत होऊनही आम्ही जिंकलो आहोत, कारण आमचे मोदी पंतप्रधान झाले आहेत असंही त्यांनी म्हटलं आहे. काही लोके मैदान जिंकण्यासाठी येतात, तर काही लोके दुसऱ्यांना पराभूत करण्यासाठी येतात असे सांगत त्यांनी बच्चू कडूंवर निशाणा साधला.

दरम्यान यावेळी त्यांनी आपला पराभव का झाला हे समजले नसल्याचेही म्हटले. मफमी माझ्या क्षेत्रासाठी ज्या पद्धतीने काम केले त्यानंतर मला यंदा जनतेने का थांबवले हे कळले नाही. राज्यात काम करायचे की कुठे हे अद्याप ठरवलेले नाहीफ्फ असे त्या म्हणाल्या. तसंच आमच्या नेत्यांना अमरावतीत काय घडले हे माहिती आहे. आम्ही त्यांना सांगायची गरज नाही असेही म्हणाल्या.

मोदी एकटे लढले, त्यांना पराभूत करण्यासाठी अनेक लोकं झुंड बनवून त्यांना रोखत होते असे सांगत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. अनुसूचित जाती-जमाती समाजातील लोकांना खोट्या स्वरूपात संविधान बदलले जाईल असे सांगत प्रचार केला. लवकरच त्यांना हा खोटा प्रचार होता याची जाणीव होईल असे त्यांनी सांगितले. मुस्लीम आरक्षणावर बोलताना त्यांनी म्हटले की, मफअनुसूचित जाती-जमातीचे आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला आरक्षण दिले जाणार असेल, तर मी अनुसूचित जाती-जमाती समाजासोबात उभी राहीनफ्फ

यावेळी त्यांनी संजय राऊतांवर टीका केली. मफउद्धव ठाकरे यांचा पोपट बोलत होता की आम्ही शपथ घेऊ आणि मोदींना निमंत्रित करू. पण सर्वांनी पाहिलं नरेंद्र मोदींनी शपथ घेतली. शेर आखिर शेर ही होता हैफ्फ असा टोला नवनीत राणा यांनी लगावला आहे. उद्धव ठाकरे यांनी मी पराभूत झाली असल्याने आता तरी हनुमान चालीसा पठण केलं पाहिजे असंही त्या म्हणाल्या.

# शेतकऱ्यांच्या खात्यावर ११३ कोटी रुपये विमा रक्कम जमा

**सोलापूर :** प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२३ मध्ये ६ लाख ७६ हजार ३११ शेतकऱ्यांनी ५ लाख २३ हजार १७७ हेक्टर पीक क्षेत्रासाठी पीक विमा भरला असून यापैकी १ लाख ९० हजार ४५८ शेतकऱ्यांच्या खात्यावर ११३ कोटी ८२ लाख रुपयांचा विमा निधी जमा झाला आहे. विमा कंपनीने बाजारी, मका तसेच सोयाबीन पिकांसाठी ही रक्कम मिळाली आहे, अशी माहिती कृषी अधीक्षक दत्तात्रय गावसाने यांनी दिली.

खरीप हंगाम २०२३ अंतर्गत प्रतिकूल परिस्थितीच्या अनुषंगाने अधिसूचित सर्व पिकासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अधिसूचना काढून २५ टक्के अग्रीम नुकसान भरपाई देण्याबाबत पीक विमा कंपनीला आदेश दिला होता. त्यादृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांनी विमा कंपनीकडे पाठपुरावा देखील केला. ओरिएंटल विमा कंपनीकडून मका, सोयाबीन व बाजरी पिकासाठी २५ टक्के अग्रीम रक्कम शेतकऱ्यांना मिळाला आहे.

# कोयनेला ३१ मिलीमीटर पाऊस; धरणात १५ टीएमसी साठा



**सातारा :** जिल्ह्यात आठ दिवसांपासून पाऊस पडत असून शुक्रवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत नवजा येथे सर्वाधिक ४५ मिलीमीटरची नोंद झाली, तर कोयनेला ३१ आणि महाबळेश्वरला ३० मिलीमीटर पाऊस पडला. गतवर्षीपेक्षा यंदा या ठिकाणी पाऊस अधिक झाला आहे, तरकोयना धरणात१५ टीएमसी साठा शिल्लक आहे. धरणात अजून पाण्याची आवक सुरू झालेली नाही.

जिल्ह्यात मान्सूनचे वेळेत आगमन झाले. त्यामुळे मागील बुधवारपासून जिल्ह्यात पाऊस पडत आहे. पूर्व, तसेच पश्चिम भागातही पावसाने दमदार हजेरी लावली आहे. मागील सहा महिने दुष्काळी झळा सोसणाऱ्या माण, खटाव, फलटण, कोरेगाव, खंडाळा तालुक्यातही पावसाने चिंब करून सोडले आहे. यामुळे गावोगावच्या ओढ्यांना पाणी वाहिले, तसेच बंधाऱ्यातही पाणीसाठा झाला आहे. परिणामी, खरीप हंगामातील पिकांना फायदा होणार आहे, तर आतापर्यंत दुष्काळी तालुक्यात गतवर्षीपेक्षा अधिक पर्जन्यमान झाले आहे.

सध्या जमिनीला वापसा येण्याची प्रतीक्षा आहे. त्यानंतरच खरीप हंगामातील पेरणीला वेग येणार आहे, तर पश्चिम भागातील कोयना, नवजा, कास, बामणोली, तापोळा, महाबळेश्वरसह कांदाटी खोऱ्यात पावसामुळे ओढे, नाले वाहू लागले आहेत. भात खाचरातही पाणी साचले आहे. त्यामुळे भात लागणीला वेग येऊ लागला आहे.जिल्ह्यात आतापर्यंत सर्वाधिक पाऊस नवजा येथे झाला आहे. १ जूनपासून नवजाला २७३ मिलीमीटर पर्जन्यमानाची नोंद झाली आहे, तर कोयनानगर येथे आतापर्यंत २१२ आणि महाबळेश्वरला २१३ मिलीमीटर पाऊस पडला आहे. शुक्रवारी सकाळच्या सुमारास कोयना धरणात१५.०५ टीएमसी पाणीसाठा शिल्लक होता. पाऊस होत असला, तरी धरणात अजून आवक सुरू झालेली नाही, तसेच शुक्रवारीही पश्चिम भागात पाऊस झाला, तर सातारा शहरात सायंकाळपर्यंत ढगाळ वातावरण होते. मागील वर्षी महाबळेश्वरला फक्त ७५ मिलीमीटर पाऊस..

जिल्ह्यात या वर्षी पावसाला लवकर सुरुवात झाली आहे. त्याचबरोबर, सतत पाऊस होत आहे. यामुळे जिल्ह्यात सर्वत्रच अधिक पाऊस पडल्याचे दिसून आलेले आहे. गेल्या वर्षी १४ जूनपर्यंत कोयनानगर येथे ४१ मिलीमीटर पाऊस झाला होता, तर नवजाला ४५ आणि महाबळेश्वर येथे ७५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती. गेल्या वर्षी कोयना धरणात १२.०८ टीएमसी एवढाच पाणीसाठा शिल्लक होता.

# लोणंद बाजारात बोकड व बकरीची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री

**सातारा :** वाई: बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर लोणंद आठवडा बाजारात बोकड व बकरीची मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री झाली. लोणंद बाजार समितीच्या आवाराला बोकड व बकरीच्या आजच्या बाजाराला जत्रेचे स्वरूप आले होते. बाजारात कोट्यावधी रुपयांची विक्रमी उलाढाल झाली.



बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर लोणंद बाजारात बोकड व बकरीची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री, कोट्यावधी रुपयांची विक्रमी उलाढाल

लोणंद बाजार समितीच्या बकरी व बोकड, जनावरे गुरुवारच्या बाजारात गर्दीच गर्दी झाली होती. पहाटे पाचपासून बाजार आवारावर दुचाकी, चार चाकी, व ट्रकमधून शेळी, मेंढी, बकरी व बोकड आवक विक्रीसाठी येत होती. त्यामुळे आजच्या बाजारात बकरी व बोकडांची सुमारे पाच, दहा, पंधरा ते वीस हजार, एक लाखांपर्यंत बोली झाली. एका बोकडाची किंमत एक लाखापेक्षा जास्त गेली होती. तर आजच्या बाजारात कित्येक कोटींची उलाढाल होणार असल्याचा अंदाज लोणंद बाजार समितीचे सभापती सुनिल शेळके - पाटील यांनी व्यक्त केला.

बाजारात बकरी व बोकड खरेदीसाठी कर्नाटक, गोवा, राज्यासह हुबळी, घारवाड, बेंगलोर, कोकणातील महाड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली आदी भागातील सुमारे पंधरा ते वीस हजारांपर्यंत खरेदीदार आले होते. तर वाहनांची संख्याही मोठी होती. बाजारात वीस हजार रुपयांपासून एक लाख रुपयांपर्यंत बोकड विकला गेला. मात्र बाजार समितीकडे ५५ हजार रुपयांपर्यंतच्या खरेदीची नोंद प्रत्यक्षात झाली. ५१ हजार रुपयांच्या पुढे व्यवहार झाले की फटाके फोडले जात होते. साधारणपणे २५ ते ४० हजार रुपये किमतीपर्यंतच्या बोकडांची मोठ्या प्रमाणावर खरेदी विक्री झाली. त्यामुळेच बाजारात कोट्यावधींची उलाढाल झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

बकरी ईदच्या बाजारात बकरी व बोकड खरेदी विक्री उलाढालीतून मोठा सेस बाजार समितीला जमा होईल, असे सचिव विठ्ठल सपकाळ यांनी सांगितले. आजच्या बाजारात मोठ्या संख्येने खरेदीदार व विक्रीदार आल्याने या परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते.

# तळा आणि म्हसळा नगरपंचायत प्रशासकीय इमारतीचा आराखडा तयार करावा

## महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई :** रायगड जिल्ह्यातील तळा आणि म्हसळा नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाचा आराखडा तातडीने तयार करून इमारतीच्या कामाला गती द्यावी, असे महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यातील तळा आणि म्हसळा नगरपंचायत प्रशासकीय इमारती संदर्भात आज मंत्रालयात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी तळा नगरपंचायतचे मुख्य अधिकारी विराज लबडे, म्हसळा नगरपंचायतचे मुख्य अधिकारी विठ्ठल राठोड व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

तळा आणि म्हसळा या दोन्ही नगरपंचायत इमारत कार्यालयासाठी जागा तसेच निधी मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचा आराखडा तयार करून यामध्ये लोकांसाठी सोयी सुविधांचा समावेश करावा. पिण्याचे पाणी, टॉयलेट, सौर ऊर्जा या सुविधांचा समावेश करून आराखडा तयार करावा, अशा सूचनाही मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.

# ८६४ रुपयांच्या कापूस बियाणे पाकिटाची १८०० ला विक्री, कृषी विभागाची कारवाई

**अमरावती :** शेतकऱ्यांची सर्वाधिक मागणी असलेल्या विशिष्ट कंपनीच्या कापूस बियाण्यांची जादा दराने व छुप्या पद्धतीने विक्री करणाऱ्या जुने कॉटेन मार्केट परिसरातील मे. नितीन कृषी केंद्रावर कृषी विभागाच्या भरारी पथकाने सापळा रचून छापा घातला.

या कारवाईत कृषी केंद्रातून या कापूस बियाण्यांची १० पाकिटे जप्त करण्यात आली. या प्रकरणी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक सागर डोंगरे (४९) यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी कृषी केंद्र संचालक नीलेश राजकुमार अग्रवाल (४८) रा. अमरावती याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

नितीन कृषी केंद्रातून विशिष्ट कंपनीच्या बियाण्यांची जादा दराने व छुप्या पद्धतीने विक्री होत असल्याची माहिती सागर डोंगरे यांना मिळाली होती. त्याआधारे सागर डोंगरे यांच्यासह जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख मल्ला तोडकर, कृषी उपसंचालक उज्वल आगरकर, मोहीम अधिकारी प्रवीण खर्चे, कृषी विकास अधिकारी अजय तळेगावकर यांनी त्याबाबत कोतवाली पोलिसांना माहिती दिली.

त्यानंतर कोतवाली ठाण्यातील दीपक श्रीवास, नरेंद्र उघडे व पंचांसोबत कृषी विभागाचे पथक नितीन कृषी केंद्राजवळ पोहोचले. यावेळी पथकाने डमी ग्राहकाला ९ हजार रुपये घेऊन नितीन कृषी केंद्रात पाठविले. डमी ग्राहकाने विशिष्ट कंपनीच्या कापूस बियाण्यांची मागणी केल्यावर कृषी केंद्र संचालक नीलेश अग्रवाल याने ८६४ रुपये प्रति पाकिट किंमत असताना १८०० रुपये अशा दामदुप्पट दराने ९ हजार रुपये घेत ५ पाकिटे डमी ग्राहकाला दिली.

त्याचे बिलदेखील दिले नाही. त्याचवेळी डमी ग्राहकाने इशारा करताच दबा धरून बसलेले कृषी विभागाच्या पथकाने कृषी केंद्रावर छापा घातला. सर्वप्रथम गल्ल्यातील डमी ग्राहकाने दिलेले ९ हजार रुपये ताब्यात घेण्यात आले. तपासणीदरम्यान कृषी केंद्रात संबंधित बियाण्यांची आणखी ५ पाकिटे आढळून आली. त्यानुसार पथकाने सदर १० पाकिटे जप्त केली.

ऐन पावसाळ्यात बियाण्यांचा काळाबाजार रोखण्याचे आव्हान कृषी विभागासमोर आहे. शेतकऱ्यांना आपल्या पसंतीचे कपाशी बियाणे मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. या बियाण्यांमध्ये काळाबाजार होत असून काही दुकानदार शेतकऱ्यांना मूळ किमतीपेक्षा दुपटीने बियाणे विकत असल्याच्या आरोप होत आहे.

शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून विभागातील सर्व कृषी केंद्रांमध्ये दर्शनी भागात साठा व दर फलक अद्ययावत नसल्यास तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश विभागीय कृषी सहसंचालक के. एस. मुळे यांनी कृषी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

# तर नावे घेऊन तुमचे उमेदवार पाडणार, मनोज जरांगेंचा सरकारला इशारा

**जालना :** मराठा आरक्षणासाठी ८ जून पासून उपोषण सुरु केलेल्या मनोज जरांगेंनी आज सहाव्या दिवशी त्यांचं उपोषण मागे घेतलं आहे. सगे-सोयऱ्यांच्या अंमलजावणीसाठी त्यांनी सरकारला एक महिन्याची मुदत दिली आहे. महत्त्वाचं म्हणजे एक महिन्यात सरकारने मागण्या मान्य केल्या नाही तर नाव घेऊन उमेदवार पाडू असा इशारा त्यांनी सरकारला दिला आहे. मनोज जरांगे यांनी याआधीही आंदोलने केली आहेत. त्या आंदोलनांमधून विविध तोडगेही निघालेले महाराष्ट्राने पाहिले आहे. अशात मनोज जरांगेंनी महत्त्वाचा इशारा सरकारला दिला आहे.

> **तर नावे घेऊन उमेदवार पाडणार**
>
> **यानंतर मनोज जरांगे म्हणाले, मफ्आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर तर आम्ही आता राजकारणात उतरणार आहोत, तसंच नावे घेऊन उमेदवार पाडणार प्रसंगी काही ठिकाणी उमेदवार देणार नाही पण नावे घेऊन उमेदवार पाडणार एवढे लक्षात घ्या असा थेट इशाराही मनोज जरांगेंनी दिले आहे. शंभूराज देसाईंनी एक महिन्याचा वेळ मागितला आहे. त्यानुसार हा वेळ दिल्यावर जरांगे यांनी एक महिन्याचा वेळ देत उपोषण स्थगित केले.**

राज्य सरकारमधील मंत्री शंभूराज देसाई, राणा जगजितसिंह आणि खासदार संदिपान भुमरे यांनी आज अंतरावाली सराटीत जाऊन मराठा आंदोलनासाठी उपोषण करणाऱ्या मनोज जरांगेंची भेट घेतली. यावेळी मराठा आरक्षणाबाबत सरकार कशा पद्धतीने काम करत आहे, याबाबतची माहिती त्यांनी मनोज जरांगे यांना दिली. मफ्सगेसोयऱ्यांची अंमलबजावणीसाठी सरकार दिरंगाई करत आहे, असा गैरसमज मनोज जरांगेंनी यांनी करू घेऊ नये, त्यांनी हा विचार डोक्यातून काढून टाकावा, असे यावेळी शंभूराज देसाई यांनी म्हटले आहे.

काय म्हणाले मनोज जरांगे?

आम्ही दिलेल्या व्याखेप्रमाणे सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करावी. ५७



लाख नोंदी मिळाल्या आहेत, त्यांचा आधार घेत मराठा आणि कुणबी एकच आहेत असा कायदा आणावा. हैदराबादचे गॅझेट आपल्या राज्यातही लागू करावे.

सातारा संस्थानचे गॅझेट लागू करावे. आंतरवली सराटीसह राज्यातील सर्व मराठा आंदोलकांवरचे गुन्हे मागे घ्यावेत. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना तातडीने प्रमाणपत्र वाटप करावे. या मागण्या मनोज जरांगेंनी शंभूराज देसाईंकडे केल्या आहेत.

लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि महायुतीला मोठा फटका बसला आहे. त्यातून धडा घेत भाजपा आणि महायुतीने कंबर कसून तयारी सुरु केली आहे. महाविकास आघाडीने १८५ जागा जिंकण्याचा दावा केला आहे. तर आता मनोज जरांगेंनी नावे घेऊन उमेदवार पाडू असा इशारा दिला आहे. त्यामुळे सरकार नेमके मराठा आरक्षणाबाबत आणि सगे सोयऱ्यांच्या अंमलबजावणीबाबत काय निर्णय घेणार? हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे. तसंच सरकारने दिलेल्या मुदतीत अंमलबजावणी केली नाही तर मनोज जरांगे राजकारणात उतरणार का? तसंच कुणाकुणाला पाडणार हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

# फळ पीक विमा योजनेत संबंधित शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे : कृषिमंत्री धनंजय मुंडे

**मुंबई :** प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षात राबवण्यासंदर्भात राज्य शासनाने मान्यता दिली असून मृग बहार व आंबिया बहारातील ठराविक फळ पिकांचा विमा शेतकऱ्यांनी भरून या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले.



या हंगामात राज्यात डाळिंब, संत्रा, मोसंबी, चिकू, पेरू, लिंबू, सीताफळ, द्राक्ष, आंबा, पपई, काजू, स्ट्रॉबेरी व द्राक्ष क इत्यादी पिकांचा फळपीक विमा योजनेत सहभाग करण्यात आला आहे. ही योजना भारतीय कृषी विमा कंपनी, बजाज अलियांज, फ्युचर जनरल आणि युनिव्हर्सल सोम्पो या चार कंपन्यांच्या मार्फत राबविण्यात येणार आहे.

मृग बहरात द्राक्ष क, संत्रा, पेरू, लिंबू या चार पिकांसाठी विमा भरण्याची अंतिम मुदत २५ जून निश्चित करण्यात आली आहे; त्याचबरोबर मोसंबी चिकू ३० जून, डाळिंब १४ जुलै तर सीताफळ पिकासाठी ३१ जुलै ही मुदत देण्यात आली आहे.

दरम्यान २०२४ ते २६ या दोन वर्षात राबविण्यात येणाऱ्या फळपिक विमा योजनेचे स्वरूप, विमा संरक्षित रक्कम यांसह सविस्तर माहिती कृषी विभागाकडून जारी करण्यात आली असून, फळ उत्पादक शेतकऱ्यांनी विहित मुदतीत आपला विमा भरून घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

# राज्यात मुस्लिम आरक्षणासाठी एनडीए'च्या घटक पक्षांकडून वाढला जोर; भाजपाचा थेट विरोध?

राज्यात मराठा आरक्षण, धनगर आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा सातत्यानं पेटलेला असताना आता त्यात मुस्लिम आरक्षणाची भर पडणार आहे. राज्यातील अल्पसंख्याक मुस्लिम समाजाला आरक्षण मिळावं अशी मागणी, सत्ताधारी पक्षातीलच नेत्यांकडून केली जात आहे. आंध्र प्रदेश सरकारनं आंध्र प्रदेशमध्ये मुस्लिमांना चार टक्के आरक्षण लागू केलं आहे. आंध्र प्रदेशमध्ये सत्तेत असलेली तेलगु देशम पार्टी ही एनडीएचा घटक पक्ष झाला आहे. भारतीय जनता पक्षाच्या धर्माच्या आधारावरील आरक्षणाला विरोध असतानाही आंध्र प्रदेशमध्ये मुस्लिमांना आरक्षण लागूच राहील, अशी ठाम भूमिका टीडीपीनं घेतली आहे. त्या पार्श्वभूमीवर आता नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मुस्लिम मते महायुतीपासून विशेषत: शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यापासून दुरावल्याचं चित्र निर्माण झालं आहे. त्यामुळं महाराष्ट्रातही मुस्लिम आरक्षणाची मागणी एनडीएच्या घटक पक्षांकडून जोर धरू लागली आहे.

आरक्षणाचा प्रस्ताव आणा अन्यथा मला मोकळ करा : मुस्लिम आरक्षणासंदर्भात शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री अब्दुल सत्तार हे अत्यंत आग्रही आहेत. राज्यातील अन्य समाजातील नागरिकांना ज्याप्रमाणे आरक्षणाचा अधिकार आहे. त्याप्रमाणं मुस्लिम समाजातील गरीब आणि वंचित तसंच मागास जातींना आरक्षण मिळालंच पाहिजे, अशी आपली ठाम भूमिका आहे. येत्या अधिवेशनात याबाबत प्रस्ताव सभागृहात मांडला गेला पाहिजे, यासाठी आपण मुख्यमंत्र्यांकडं मागणी करत आहोत. जर मुस्लिम आरक्षणाचा प्रस्ताव विधानसभेत आणता येणार नसेल तर मग मला पदाच्या जबाबदारीतून मोकळं करा, असंही आपण स्पष्ट केलं आहे, असं मंत्री सत्तार यांनी सांगितलय.

अल्पसंख्याक समाजाला न्याय मिळाला पाहिजे : एनडीएचा घटक पक्ष असलेल्या अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसनंही मुस्लिम आरक्षणाबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. मुस्लिम समाजातील मागास आणि गरीब लोकांवर अन्याय होत आहे. त्यांच्या विविध समस्यांना सोडवलं गेलं पाहिजे यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटानं नुकतीच अल्पसंख्याक सेलची एक बैठक घेतली. या बैठकीनंतर मुस्लिम आरक्षणासंदर्भात लवकरच विधानसभेत चर्चा करण्याचा निर्णयही घेतला गेला आहे. त्यामुळं याबाबत येत्या अधिवेशनात चर्चा होईल असं राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितलं.

भाजपा आपल्या भूमिकेवर ठाम : यासंदर्भात बोलताना भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते डॉ. शिवराय कुलकर्णी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये जे आरक्षण दिले आहे. ते आरक्षण हिंदू धर्मातील ज्या जाती मागास होत्या त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना समान संधी देण्यासाठी आरक्षणाची तजवीज करण्यात आलीय.

यामध्ये धर्माचा विषय येतोच कुठे? त्यामुळं धार्मिक आधारावर मुस्लिम समाजाला आरक्षण देता येणार नाही, ही आमची भूमिका कायम आहे. या संदर्भात जरी भविष्यात आमच्या सहयोगी पक्षांनी वेगळी भूमिका मांडली आणि मुस्लिम आरक्षणाची मागणी केली तरीसुद्धा आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम राहणार आहोत. धर्माच्या आधारावर मुस्लिम समाजाला आरक्षण देता येणार नाही ही आमची भूमिका कायम असेल असे कुलकर्णी यांनी सांगितले.

# बकरी ईद निमित्त कुर्बानीची परवानगी देणाऱ्या पालिकेला हायकोर्टाचा दिलासा

**मुंबई :** बकरी ईद निमित्त कुर्बानीची परवानगी देणाऱ्या पालिकेला मुंबई उच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. बीएमसीने याबाबत २९ मे रोजी जारी केलेल्या परिपत्रकाला विरोध करत हायकोर्टात आलेल्या जीव मैत्री ट्रस्टला दिलासा देण्यास हायकोर्टाचा नकार दिला आहे. मात्र, कुठल्याही रहिवासी इमारतीत कत्तलीला परवानगी नाही. देवनार व्यतिरिक्त पालिकेने परवानगी दिलेल्या ११४ जागांवरच कत्तलीची परवानगी बकरी ईद निमित्त १७ ते १९ जून दरम्यान ही परवानगी ४७ पालिका मंडई आणि ६७ खासगी मटन शॉपवर परवानगी लागू राहील.

**पालिकेला हायकोर्टाचा दिलासा**

बकरी ईद निमित्त देण्यात येणाऱ्या कुर्बानीसाठी मुंबई पालिकेने काढलेल्या परिपत्रकाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देणात आलंय. मजीव मैत्री ट्रस्टफ्ने देवनार पशूवधगृहाबाहेर होणाऱ्या कुर्बानीला सरसकट विरोध करत दाखल केलेल्या याचिकेवर त्यांना तातडीने दिलासा देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने गुरूवारी



नकार दिला. दिलासा मागण्यासाठी शेवटच्या क्षणाला कोर्टात येऊ नका, दाद मागण्यासाठी इतरही यंत्रणा आहेत, असे हायकोर्टाने म्हटलेले असतानाही याचिकाकर्ते शुक्रवारी मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठापुढे दाद मागण्याच्या तयारीत आहेत.

बकरी ईद निमित्त ठराविक ठिकाणी कुर्बानीची परवानगी

न्यायमूर्ती एम. के. सोनाक आणि न्यायमूर्ती कनल खता यांच्या खंडपीठाने ट्रस्टची मागणी फेटाळून लावल्याने पालिका मंडई आणि काही खासगी मटण शॉपमध्ये कुर्बानी देण्याचा मार्ग तूर्तास मोकळा झाला आहे. मात्र, त्याव्यतिरिक्त रहिवासी सोसायट्या आणि इतरत्र ठिकाणी कुर्बानी देणाऱ्यांविरोधात कारवाई केली जाईल, असेही पालिकेने हायकोर्टात स्पष्ट केले आहे.

**काय आहे याचिका?**

बकरी ईद निमित्त मुंबई महापालिकेनं २९ मे २०२४ रोजी कुर्बानी संदर्भात परिपत्रक काढलेले आहे. या परिपत्रकानुसार विमानतळ, मंदिर, शाळा, रेल्वे स्थानक आणि रुग्णालयाच्या आसपास कुर्बानीला थेट परवानगी दिल्याने नियमांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करत जीवमैत्री ट्रस्टने हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. यात देवनार पशूवधगृहाव्यतिरिक्त खासगी मटण शॉप तसेच पालिका मंडईत परवानगी देण्यात येऊ नये, अशी विनंती त्यांनी न्यायालयाला केली आहे.

गुरूवारच्या सुनावणीत जीव मैत्री ट्रस्टच्यावतीनं वकील राजूजी गुप्ता यांनी खंडपीठाला सांगितले की, पालिकेचं हे परिपत्रक बेकायदेशीर असून त्याला तातडीनं स्थगिती देण्यात यावी. यावर पालिकेच्या वतीने ज्येष्ठ वकील मिलींद साठ्ये यांनी युक्तिवाद केला. त्यांनी खंडपीठाला सांगितले की, दरवर्षी ईदच्या तोंडावर अशा प्रकारच्या याचिका दाखल केल्या जातात. गेल्या वर्षी ८ जूनच्या आदेशात हायकोर्टानं अंतरिम दिलासा देत मुंबईत केवळ तीन दिवस म्हणजेच १७ ते १९ जून दरम्यान ६७ खासगी दुकाने तर ४७ पालिका मंडईत कत्तलीला परवानगी देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त इतर कोणालाही परवानगी देण्यात आलेली नाही.

हायकोर्टाने दोन्ही बाजूंकडील युक्तिवाद ऐकून घेत याचिकाकर्त्यांना कोणताही दिलासा देण्यास नकार दिला. तसेच शेवटच्या क्षणाला तातडीच्या विनंतीवरून अशाप्रकारे अंतरिम दिलासा देता येत नाहीस असेही खंडपीठाने नमूद केले. तसेच कोणत्याही धोरणाचे किंवा कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन झाल्यास तक्रार दाखल करण्यासाठी पालिकेने एक यंत्रणा ठेवली आहे, याची हायकोर्टान याचिका कर्त्यांना जाणीव करून दिली.

# तासगाव पूर्व भागात ढगफुटीसदृश पाऊस : दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

**तासगाव :** तासगाव तालुक्याच्या पूर्वभागातील गावांना गुरुवारी दुपारी मुसळधार पावसाने झोडपून काढले. ढगफुटी सदृश पावसाने बस्तवडे, खुजगाव, सावळज, वायफळे, वाघापूर, वज्रचौंडे, मणेराजुरीसह परिसरातील ओढे, नाल्यांना पूर आल्याचे चित्र होते. अनेक ठिकाणी वाहतूक ठप्प झाली होती.



तासगाव पूर्व भागातील सावळज, मणेराजुरी, सावर्डे, वाघापूर, वज्रचौंडे, बस्तवडे, बलगवडे, खुजगाव, आरवडे, जरंडी, सिद्धेवाडी, दहिवडी, डोंगरसोनी, वायफळे, बिरणवाडी, अंजनी, गव्हाण या परिसरात मुसळधारपाऊसझाला. सावळसह परिसरातील गावात ढगफुटीसदृशपाऊसझाला. या पावसामुळे ओढे, नाल्यांना पूर आला. अनेक ठिकाणी रस्त्यावरून पाण्याचे लोट वाहत होते. त्यामुळे बस्तवडे, खुजगाव, सावळज, वायफळे, मणेराजुरी परिसरात अनेक ठिकाणी वाहतूक ठप्प झाली होती. मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना जोरदार पावसामुळे दिलासा मिळाला आहे.

मणेराजुरी, सावर्डे, वज्रचौंडे सावळज, डोंगरसनी, अंजनी, बिरणवाडी, खुजगाव सिद्धेवाडी दहिवडी परिसरात गुरुवारी दुपारी दोन ते तीन तास जोरदार पाऊस झाला. मुसळधार पाऊस विविध ठिकाणी झाला आहे. मणेराजुरीत व भोसलेनगर परिसर भागात जोरदार पाऊस झाला. द्राक्ष बागातून व रस्त्यातून पाणी वाहू लागले. सिद्धेवाडी तलाव, अंजनी तलावात पाण्याचा ओघ वाढला आहे.

पावसामुळे द्राक्ष बागेच्या सरीत पाणी साचले आहे. चांगला पाऊस झाल्याने पेरणीला वेग येईल. यावर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीस जोरदार पाऊस सुरू झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. दुष्काळात होरपळलेल्या शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. जनावरांना चारा व शेतीला पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होणार आहे.